# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२

## ( सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत )

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)**

(१) **श्री.समाधान आवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"माहे नोव्हेंबर, २०२२ व त्या सुमारास "शालेय पोषण आहार योजने अंतर्गत" सोलापूर जिल्ह्यासहित संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याची बाब उघडकीस येणे, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना पोषणयुक्त आहार मिळावे याकरता सदरची योजना सन २००९ मध्ये शासनामार्फत चालू करण्यात येणे, सदरची योजना मागील १३ वर्षापासून पूर्ण राज्यात चालू असणे, परंतु जिल्हास्तरावर निविदा काढताना अनेक वेळेस संबंधित अधिकाऱ्यांमार्फत ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे शासन नियमाचे पालन न करता ठेकेदाराच्या अटी शर्तीनुसार निविदा काढण्यात येत असणे, सदर निविदा काढताना निविदेमध्ये एक दिवस अगोदरच नियमबाह्य धान्याचे नमुने मागवून त्याप्रमाणे ठेकेदार सामूहिकरित्या निविदेचे दर भरत असणे, निविदा भरताना दाखवण्यात येणाऱ्या धान्याचे नमुने व प्रत्यक्षात पुरवठा करण्यात येत असलेल्या धान्यात खूप मोठी तफावत असणे, बहुतांश वेळा सदर ठेकेदारांमार्फत योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणारे चांगल्या प्रतीचे धान्य खुल्या बाजारात विकून त्याऐवजी भेसळयुक्त अन्नधान्य शाळांना पुरविण्यात येत असणे, तसेच शासनाने निश्चित केलेल्या धान्यांच्या दरापेक्षा अधिक किंमतीत धान्य खरेदी करणे, उदाहरणार्थ मागील वर्षभरात शासनाने सर्व जिल्हास्तरावर चणाडाळ व मुगडाळ मोठ्या प्रमाणात वाटप केला असून सरकारी यंत्रणेकडे चणाडाळ रुपये ५२ प्रति किलो, तुरडाळ रुपये ६० प्रति किलो व मुगडाळ रुपये ५८ प्रति किलो या दरात उपलब्ध

असताना देखील जाणून-बुजून ठेकेदारांमार्फत शालेय पोषण आहारामध्ये धान्य पुरविताना चणा रुपये ७८ प्रति किलो, मुगडाळ रुपये ९५ प्रति किलो व तूरडाळ रुपये १०५ प्रति किलो या दराने विकत घेण्यात येणे, यामध्ये शासनाच्या पैशांचा मोठ्या प्रमाणात अपहार होत असल्याचे निदर्शनास येणे, अनेक वेळेस जिल्हास्तरावर निघालेल्या निविदेमध्ये ज्या जिल्ह्यामध्ये तीन पेक्षा कमी निविदा आल्या आहेत त्या ठिकाणी शासन नियमानुसार निविदा काढणे आवश्यक असताना संबंधित अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून बाजूच्या जिल्ह्यातील ठेकेदारालाच सदरचे काम देत असल्याचे निदर्शनास येणे, या सर्व अवैध प्रकाराला आळा बसावा याकरिता प्रत्यक्षात ठेकेदारांना सदरचे काम देण्याऐवजी गरजू महिला बचत गटांना सदरचे काम देण्यासंदर्भातची मागणी सामाजिक संस्थेमार्फत वारंवार करण्यात येणे, तसेच सर्व धान्य खरेदी शासनाच्या नाफेड किंवा दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑप. मार्केटिंग फेडरेशन यांचेकडून करण्याची आवश्यकता असणे, शासनाच्या योजनेचा गैरवापर करून स्वत:चे खिसे भरणारे अधिकारी व ठेकेदार हे दोघे संगनमताने करत असलेल्या भ्रष्टाचारामुळे भविष्यात विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होणार असणे, याबाबत संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचे विरुद्ध सर्वसामान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष पसरलेला असणे, यावर उपाय म्हणून शासनाने तातडीने उच्चस्तरीय समिती नेमून होत असलेला व झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर ताबडतोब करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **डॉ.राहुल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी कृषी विषयक माहिती, कृषी उत्पादनात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध प्रयोग व संशोधन करण्यासाठी व विद्यार्थ्यांना कृषी विषयक शिक्षण मिळावे याकरीता परभणी येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात येणे, सदर कृषी विद्यापीठात सद्य:स्थितीत ५२ ते ५३ टक्के कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, सन २०१७ पासून रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, विद्यापीठ प्रशासनामार्फत दर ३ महिन्यांनी शासनाकडे रिक्त पदाबाबतचा अहवाल सादर करण्यात येणे, तथापि परभणी येथील कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी कृषी विषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा होणारा विपरीत परिणाम, त्याचप्रमाणे कृषी विषयक संशोधन करण्यात येत असलेल्या अडचणी, गेल्या काही वर्षापासून मराठवाड्यात ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस अशा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संकटात सापडलेला असणे, त्यामुळे कृषी विषयक संशोधनाची नितांत आवश्यकता

असणे, परंतू कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे संशोधनाचा अभाव भासत असणे, शासनाने रिक्त असलेली सर्व पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होणे, या निमित्त शासनामार्फत ५० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात येणे, परंतू अद्यापही सदर मंजूर निधी विद्यापीठास वर्ग करण्यात न येणे, सदर निधी कृषी क्षेत्राची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने नवनवीन संशोधन कार्य व कृषी विषयक शिक्षण घेणाऱ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या अनुषंगाने अत्यल्प असणे, त्यामुळे सदर निधीत वाढ करुन किमान १०० कोटी रुपये मंजूर करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत निर्णय घेण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(३) **श्री. अजित पवार, डॉ. विनय कोरे, सर्वश्री. बबनराव शिंदे, दिलीप वळसे-पाटील, रोहित पवार, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री. संजयमामा शिंदे, यशवंत माने, बाळासाहेब पाटील, बाबासाहेब पाटील, हसन मुश्रीफ, राजेश टोपे, चंद्रकांत नवघरे, दिलीप मोहिते-पाटील, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. दत्तात्रय भरणे, अतुल बेनके, प्रकाश सोळंके, संग्राम जगताप, दिलीपराव बनकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक साखर कारखाने सोलापूर जिल्हयात असून ऊस वाहतूकदार हे ऊस तोडणी व वाहतुकीचा करार साखर कारखान्याकडे करत असणे, सदर ऊस वाहतूकदार हे शेतकऱ्यांची मुले असून काही सुशिक्षित बेरोजगार तरुण ऊस वाहतुकीचा व्यवसाय करत असणे, याकरीता ऊस वाहतूकदार बीड, धुळे, नंदूरबार, नांदेड, अहमदनगर, यवतमाळ, हिंगोली, तसेच कर्नाटक, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व गुजरात या भागातून ऊस तोडणीसाठी मजूर करार करुन संबंधीत कारखान्याच्या कार्यक्षेत्रात येत असणे, ऊस तोडणी वाहतूक करणाऱ्या वाहन मालक शेतकऱ्यांकडून तोडणी मजूर पुरवणारे मुकादम लाखो रुपये उचल घेत असणे व मजूर पुरवठा न करता ते वाहन मालकाचे पैसे बुडवत असणे, गळीत हंगामामध्ये काही मजूर मधूनच पळून जात असणे, वाहन मालकाला धमक्या देत असणे, अशा घटना सातत्याने घडत असणे, एकट्या सोलापूर जिल्ह्यातील ३० ते ३२ साखर कारखान्यांकडे ऊस वाहतूक करणाऱ्या वाहन मालकांचे मुकादमांनी मागील गळीत हंगामामध्ये सुमारे १२५ कोटी रुपये बुडवले असणे, याबाबत वाहनधारक हे संबंधित पोलीस स्टेशनला मुकादमाकडून झालेल्या फसवणूकीची तक्रार दाखल करण्यास गेल्यानंतर पोलीस स्टेशन गुन्हा दाखल करुन घेत नसणे, याउलट वाहन मालक संबंधित मुकादम, मजूर यांना बोलल्यास किंवा कायद्याची भाषा वापरल्यास हेच मुकादम व मजूर वाहन मालकांवर गुन्हे दाखल करत असणे, त्यांची दखल त्वरीत पोलीस स्टेशनमध्ये घेतली जात असणे, माढा तालुक्यातील गणेश पोपट ढोरे रा. रिधोरे व यशवंत शंकर खोटे रा. अंजनगाव (उमाटे) येथील वाहन मालकांना

तुरुंगात जावे लागले असणे, नुकतेच बेंबळे, ता. माढा, जि. सोलापूर येथील ऊस वाहतूकदार प्रशांत (आण्णा) महादेव भोसले हे मध्यप्रदेशातील ऊस तोड मजूर घेऊन येत असतांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२ रोजी खांडवा (मध्यप्रदेश) पासून अर्धा कि.मी. अंतरावर चिचोळी या ठिकाणी मुकादम व मजूर यांनी संगनमत करुन त्यांच्या जवळील पैसे व मोबाईल घेऊन त्यांची निघृण हत्या केलेली असणे, यामुळे ऊस वाहतूक करणारे वाहनधारक यांची आर्थिक फसवणूकीमुळे राज्यात दरवर्षी कोट्यावधी रुपयांचे नुकसान होत असणे, परिणामी ऊस वाहतूकदार यांचे कुटुंबावर उपासमारीची वेळ येणे यासाठी वाहनधारकांची लुट थांबविणेसाठी त्यांना शासनाने संरक्षण देणे व दोषी असलेल्या टोळी मुकादम व संबंधितांवर गुन्हा दाखल करुन घेऊन ऊस वाहतूकदारांची मुकादम यांच्याकडून होणारी आर्थिक व जिवीतहानी टाळण्यासाठी ऊस वाहतूकदार संघटनांकडून वारंवार मागणी होत असून व त्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे ऊस वाहतूकदाराच्या मनात शासनाच्या विषयी झालेली तीव्र नाराजी, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

(४) **सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, अजित पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमा वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पंचायत समिती इमारत, खेड आळंदी, जि.पुणे बांधकामाबाबत दिनांक ११/९/२०१९ रोजी व त्यासुमारास कार्यारंभ आदेश देणे, तद्नंतर दिनांक ०७/०७/२०२० रोजी कार्यारंभ आदेश जिल्हा परिषद पुणे यांनी मासिक सभेमध्ये रद्द करुन ठेकेदारांचे ई.एम.डी. देयके अदा करण्याचे ठरवणे, पंचायत समितीचा सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ रोजी सादर करुन रुपये १६ कोटी अदा करणे, मा.जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे सीआर/८/२०२१ पुणे दिनांक २४/०५/२०१९ रोजीचे आदेश जागा नोंद करण्याचे राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम तांत्रिक मंजुरी देणे, राजगुरुनगर इमारत प्रशासकीय मान्यता व बांधकाम नकाशे कार्यरंभ आदेशाआधी प्रशासकीय इमारत बाबत बांधकाम परवानगी देणे, मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे जिल्हा यांच्यासमोर प्रशासकीय इमारत संकुल राजगुरुनगर इमारतीचे सादरीकरण करून सुधारणा करणे, प्रशासकीय इमारत संकुल राजगुरुनगर गट नंबर २०९ व २१० मध्ये इमारत बांधकामास कार्यारंभ आदेश दिनांक ०४/०७/२०२२ रोजी देणे, मा.जिल्हाधिकारी पुणे यांच्या आदेश जाक्र/खेड/सीआर/८/२०२२, दि.०७/१०/२०२२ च्या आदेशान्वये जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव रद्द करणे परंतु त्यामध्ये विसंगती दिसून येणे, त्यामुळे मध्यवर्ती प्रशासकीय संकुलाला बांधकाम करण्यास अडथळा निर्माण होणे, खेड

अग्रिम प्रत

आळंदी तालुक्यातील शासकीय कार्यालय विविध ठिकाणी असल्याने कामकाजानिमित्त नागरिकांना गैरसोयीचे होत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण असणे याबाबत शासनाने करावायाची कार्यवाही व भूमिका."

(५) **श्री.कुणाल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"धुळे जिल्ह्यासह धुळे तालुक्यात गेल्या दोन वर्षांपासून अतिवृष्टी व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे व बहुवार्षिक पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असणे, शेतकऱ्यांचे कापूस, मका, बाजरी, ज्वारी, कांदा, कडधान्य, यासह फळबागायत व भाजीपाला पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, शेतात पाणी साचल्यामुळे खरिपाची इतर पिकेही पाण्याखाली गेलेली असणे, तसेच मुसळधार व संततधार पावसामुळे अनेक घरांची पडझड होऊन असंख्य कुटुंबे उघड्यावर आलेली असणे, शासनाने सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता असणे, धुळे तालुक्यात दिनांक ३१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर, २०२२ या कालावधीत ७७० हेक्टर क्षेत्र बाधित झालेले असणे, तसेच दिनांक १८ व १९ सप्टेंबर, २०२२ रोजी ३६ हजार ५०० हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून त्याचा अहवालही शासनास संबंधित विभागाने पाठविला असणे, परंतु अद्यापही सदर शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळालेली नसणे, धुळे जिल्ह्यासाठी माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत बाधित क्षेत्राकरिता एकूण ५४ कोटी ६३ लक्ष ६ हजार ८९५ व धुळे तालुक्यासाठी ५१ कोटी ४५ लक्ष २३ हजार ६०८ रुपये एवढ्या निधीची मागणी करण्यात आलेली असणे, त्यापैकी जून २०२२ अखेर झालेल्या अतिवृष्टीतील नुकसानीचे जिल्ह्याला एकूण ३ कोटी ३९ लक्ष ५२ हजार रुपये व धुळे तालुक्यासाठी फक्त ६६ लक्ष ७ हजार २५६ रूपये मिळालेले असणे, उर्वरित रक्कम अद्यापही मिळालेली नसल्याने धुळे तालुक्यातील अनेक शेतकरी या मदतीपासून वंचित राहिलेले असणे, तसेच ऑक्टोबर- नोव्हेंबर २०१९ मध्ये धुळे तालुक्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असणे, त्या नुकसानाची भरपाई अद्यापही मिळालेली नसणे, धुळे तालुक्यातील शेतकरी त्याही मदतीपासून वंचित राहिलेले असून त्यासाठी शेतकऱ्यांना मदतीची रक्कम देण्यासाठी बाकी असलेले एकूण आठ कोटी ४७ लक्ष ५७ हजार रुपये अनुदानही देण्याची आवश्यकता असणे, परंतु शासनाचे सदर मदत देण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने सदर शेतकरी वर्गात शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, परिणामी धुळे जिल्ह्यातील व धुळे तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानाची भरपाई तातडीने देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व यावर राज्यशासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.प्रमोद पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे जिल्ह्यात नागरीकरण दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणावर होत असल्याने मध्य रेल्वे सह वाहनांनी प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत असून सध्या अस्तित्वात असलेल्या कल्याण-शीळ रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे वाहन चालक हैराण होत असणे, त्यामुळे त्यासाठी तत्कालीन डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार कै. हरिश्चंद्र पाटील यांनी पहिल्यांदा डोंबिवली-मुंब्रा समांतर रस्ता तयार करण्याची मागणी केली असणे, त्यावेळी तत्कालीन आमदार व विद्यमान मुख्यमंत्री यांनी देखील समर्थन दर्शविले होते. यासंदर्भात २००७ साली मुंबई महानगर प्रादेशिक विभागाच्या बैठकीत रस्त्याच्या डीवीआर तयार करण्यासाठी ९३ कोटी रुपयाचा निधीही मंजूर करण्यात आल्यानंतर पर्यावरण विभागाच्या परवानग्या अभावी रेल्वे समांतर रस्तामितीस केवळ कागदपत्रावरच राहिल्याने व सद्यस्थितीत कल्याण-शीळ रस्त्यावरील दिवसेंदिवस वाढीस लागलेल्या वाहतूक कोंडीमुळे वाहन चालकांना सोसाव्या लागणाऱ्या गंभीर समस्या विचारात घेऊन कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १३ नोव्हेंबर २०२२ रोजी राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री यांना डोंबिवली-कोपर-दिवा-मुंब्रा समांतर रस्त्याचे कामास विनाविलंब मंजुरी होऊन त्यांचे अंमलबजावणी व्हावी अशा आशयाचे एक सविस्तर निवेदन सादर केलेले असणे. आजच्या घडीला कल्याण-शिळ रस्त्याला पर्यायी मार्ग डोंबिवली-दिवा-कोपर-मुंब्रा रेल्वे समांतर रस्ता झाल्यास कल्याण-डोंबिवलीसह आजूबाजूच्या शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याने याबाबत तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री.भास्कर जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"रत्नागिरी जिल्हा हा सहयाद्री पर्वत रांग व अरबी समुद्र या दोहोंच्यामध्ये वसलेला व मध्यम लोकवस्ती आणि वनसंपदेने नटलेला जिल्हा असणे, जिल्हयातील सुशिक्षित तसेच छोटी-मोठी विविध प्रकारची कामे करणारा कारागिरवर्ग मोठया संख्येने मुंबई, पुणेसारख्या शहरामध्ये वास्तव्याला असणे, उर्वरित स्थानिक नागरिक हे जिल्हयामध्ये असलेले चिरेखाण, वाळू, आंबा, काजू, नारळ, सुपारीच्या बागा, काजू प्रक्रिया उदयोग अशाप्रकारचे लहान-मोठे पारंपारिक उदयोग व मोलमजुरी करून आपली उपजिविका भागवित असणे, यातून बहुतांश कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असणे, असे असताना केंद्र शासनाने पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबतची अधिसूचना प्रसिध्द केलेली असणे, त्यामध्ये

रत्नागिरी जिल्हयातील २९३ गावांचा समावेश करण्यात आलेला असणे, वस्तुतः सदर यातील असंख्य गावे ही पश्चिम घाटापासून कितीतरी दूर असून मुंबई-गोवा महामार्गाच्या पश्चिम दिशेत असणे आणि याच गावांमध्ये जांभा दगडासारखे गौण खनिज असून अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे ते साधन असणे, सदर अधिसूचना मंजूर झाल्यास जिल्हयातील पारंपारिक उदयोग संपुष्टात येवून हजारो कुटुंबांवर संकट ओढविण्याची भीती, परिणामी बेरोजगारी वाढण्याची तसेच जिल्हयाच्या पर्यटन विकासावर फार मोठा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता, ही गंभीर बाब लक्षात घेवून पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात आलेली गावे तात्काळ वगळण्यात यावीत तसेच पश्चिम घाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या पुनर्सर्वेक्षण करण्यात यावे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.विनोद अग्रवाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पूर्व विदर्भातील गोंदिया जिल्हा नवेगाव-नागझीरा व्याघ्र प्रकल्पाकरीता ओळखल्या जात असुन संपूर्ण जिल्हा वनांनी व्याप्त असणे, जिल्हयामध्ये मोठयाप्रमाणात धान पिकासह तुर, चना, मका तथा इतर भाजीपाल्याचे उत्पादन घेण्यात येत असणे, जिल्हयातील अनेक शेतकरी बांधवांच्या शेत्या वनांलगत असणे, वनांमधील वन्यप्राणी या शेतातील पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान करीत असणे, तसेच वनांलगत असलेल्या गावामध्ये माकड घरांचे कवेलु, तथा इतर सामानांचे सुध्दा नुकसान करीत असणे,माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये ओडीसा राज्यातील २० ते ३० हत्तींचा कळप छत्तीसगड राज्यामार्गे राज्यातील गडचिरोली जिल्ह्यामध्ये शिरणे, गडचिरोली जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणात पिकांचे तथा घरांचे नुकसान करीत माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये गोंदिया जिल्ह्यामध्ये शिरणे, याठिकाणी सुध्दा धान पिकांसह घरांचे नुकसान करीत भंडारा जिल्ह्यामध्ये प्रवेश करणे, त्यामुळे आधिच निसर्गाचे लहरीपणा, नापिकी, किडीचा प्रादुर्भाव यामुळे हवालदिल झालेला शेतकरी बांधव वन्यप्राणी तथा हत्तींमुळे भयग्रस्त झालेला असणे, याबाबत वन विभागाकडे वारंवार तक्रारी करून नुकसान भरपाईसह कोणतीही ठोस स्वरूपाची कार्यवाही करण्यात आलेली नसणे, त्यामुळे पूर्व विदर्भातील गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा जिल्ह्यातील शेतकरी बांधवांमध्ये मोठ्याप्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही तथा शासनाची प्रतिक्रीया."

(९) **सर्वश्री अतुल भातखळकर, छगन भुजबळ, अजित पवार, धनंजय मुंडे, दिलीप वळसे-पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री अमित देशमुख, बाळासाहेब थोरात, कुणाल पाटील, नानाभाऊ पटोले, डॉ. नितिन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री धिरज देशमुख, झीशान सिद्दिकी, श्रीमती यामिनी यशवंत**

अप्रकाशित प्रत

**जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरातील हवेचा दर्जा हा अतिवाईट असल्याबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व सफर यांनी नोंद केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे हवेच्या गुणवत्तेचा दर्जा खालावत असणे, तसेच, वाढत्या हवा प्रदूषणामुळे त्याचा आरोग्यावर मोठा परिणाम होत असणे, त्यामुळे, शहरातील हवेची ढासळती गुणवत्ता, वाढते प्रदूषण याचा अभ्यास करून उपाययोजना करण्याची गरज असणे, तसेच, महत्वाच्या वाहतुकीच्या ठिकाणी हवा शुद्धीकरण यंत्र (एअर प्युरीफायर) बसवण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **श्री.रईस शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून जवळपास ४९ शाळा चालवल्या जात असणे, सदर शाळांची सध्याची अवस्था अत्यंत दयनीय असणे, महानगरपालिकेच्या शाळांची अवस्था धोकादायक स्थिती असणे, कॅटेगरी-१ मधील २ शाळा बंद करण्यात येणे व कॅटेगरी २ मध्ये २५ शाळा असणे, सदरविषयी मानव अधिकार आयोगाने शाळांच्या सदयस्थितीबाबत नोटीस बजावलेली असणे, सन २०२१-२२ माध्यमनिहाय संच मान्यतेनुसार ४० शिक्षकांची पदे रिक्त असणे, मनपातर्फे विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पुस्तके पुरविले जात नसून शौचालय, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांची देखील वाणवा असणे, शाळांच्या डागडुजी व दुरुस्तीकरिताचा ३० कोटी रुपयांचा विशेष निधी प्रस्ताव मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे प्रलंबित असणे, महानगरपालिकेने उत्पन्नामधून शाळा दुरुस्ती करिता व नवीन शाळा बांधण्याकरता खर्च न करण्याचा ठराव पास करणे, मात्र महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्येच्या प्रमाणात शाळांची आवश्यकता असून मनपाच्या सर्व माध्यमांच्या शाळा असून संच मान्यतेनुसार शिक्षकांच्या जागा रिक्त असणे, शासन परवानगीविना जिल्हा बदलीचे आदेश देण्यास मनाई असताना नियमबाह्य पद्धतीने शिक्षकांना जिल्हा बदली करण्यात येणे, परिणामी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये रिक्त शिक्षकांची संख्या वाढल्याने शिक्षणाचा दर्जा खालावून गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहणे त्यामुळे विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसाण होणे, तसेच स्थानिक रहिवाशांमध्ये वाढत असलेला असंतोष कमी करण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

(११) **सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"युनानी चिकित्सा पद्धती भारतात फार पुरातन काळापासून प्रभावशाली पद्धतीने वापरली जात असणे, आज भारत एक असा प्रमुख देश आहे की जेथे युनानी चिकित्सेचा अभ्यास ही केला जात असणे, तसेच भारतात मोठ्या संख्येने युनानी संशोधन संस्था देखील असणे, आज युनानी औषध प्रणाली मान्यता प्राप्त चिकित्सक रुग्णालय आणि शैक्षणिक व संशोधन संस्था बरोबर राष्ट्रीय आरोग्य देखभाल प्रणालीचा एक अविभाज्य हिस्सा होऊन बसने, सध्या युनानी औषध प्रणाली जनतेत बरीच लोकप्रिय होणे, देशभरात विखुरलेले युनानी चिकित्सेचे चिकित्सक राष्ट्रीय आरोग्य देखरेख वितरण संरचनेचा एक अभिन्न अंग असणे, सरकारी उपलब्ध आकड्यानुसार ४७९६३ पंजीकृत युनानी चिकित्सक देशभरात असणे, सध्या १५ राज्यांमध्ये युनानी रुग्णालये असणे, एकंदरीत देशभरातील वेगवेगळ्या राज्यात कार्यरत असलेली एकूण २६३ इतकी रुग्णालये असणे, देशातील २० राज्यामध्ये युनानी औषधालये असणे, कोरोना काळात युनानी डॉक्टरांनी चांगली कामगिरी करणे, महाराष्ट्रातील प्रत्येक शहरामध्ये बियूएमएस डॉक्टरांनी मागील काही दशकात चांगली कामगिरी केले असल्याचे निदर्शनास येणे, एमबीबीएस/ बीएएमएस/ बीएचएमएस डॉक्टरांसारखेच बियुएमएस डॉक्टरांना हि मान्यता देण्याची मागणी करण्यात येणे, बियूएमएस डॉक्टरांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, तसेच शासकीय भरती मध्ये बियूएमएस डॉक्टरांचा समावेश न करण्यात येणे, बियूएमएस डॉक्टरांना शासकीय सेवेत समावेश करून घेण्याबाबत सर्व संघटना युनानी महाविद्यालय स्तरावरून मागणी करण्यात येणे, मराठवाडा येथे दोन वर्षांपासून पदे रिक्त असताना न भरण्यात येणे, युनानी चिकित्सालयाच्या अटी व शर्ती शासनाकडून मान्य न करण्यात येणे, युनानी विभागाच्या सेवा पुढे चालू ठेवण्यासाठी कायम स्वरूपात वैद्यकीय अधिकारी (BUMS) पद उपलब्ध असण्याची अत्यंत आवश्यकता, सदर विषयी वारंवार मागणी करूनही मागणी पूर्ण न होणे, सदर विषयी शासनाने केलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

अस्वाक्षरित प्रत

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव —**

२६ डिसेंबर हा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून दरवर्षी साजरा करण्याची घोषणा करून त्याची अंमलबजावणी केल्याबद्दल भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांचे अभिनंदन करण्याबाबतचा प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : **(क)** संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१६-२०१७, व २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** मुंबई रेल्वे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(क)** डी. वाय. पाटील कृषि व तंत्र विद्यापीठ, तळसंदे कोल्हापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

अग्रिम प्रत

(**ख**) सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(**ग**) एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(**घ**) संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(**ङ**) विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(**च**) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक हिशोब पत्रके सभागृहासमोर ठेवतील.

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ५)**

अप्रधारित प्रत

(१) **श्री.सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील दक्षिण सोलापूर मध्ये अवैध कत्तलखाने असल्याचे उघड होणे सदर कत्तलखान्यात बांग्लादेशी घुसखोर असल्याची धक्कादायक बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये समोर येणे अनधिकृत कत्तलखाने असल्याने तेथील स्थानिक नागरिकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक प्रशासन सदर प्रकरणाबाबत गंभीर नसल्याचे दिसून येणे, तक्रार असूनही कोणतीही कारवाई होत नसून स्थानिक प्रशासन कोणतीही कारवाई करत नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे, सदर प्रकरणी स्थानिक प्रशासनावर प्रचंड दबाव असल्याची शक्यता निर्माण होणे, सदर प्रकरणी कोणाचा दबाव आहे हे शोधून काढण्याची गरज असणे, सदर अवैध कत्तलखान्यामुळे स्थानिक ठिकाणी रोगराई पसरत असून तेथे पाणी प्रदूषण होऊन वेगवेगळे आजार पसरत असल्याची बाब समोर येणे, त्या ठिकाणी बांग्लादेशी घुसखोर असल्याची बाब समोर आल्याने सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे, तेथे या संबंधात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.प्रशांत बंब, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये स्थापत्य पदविका (Diploma) आधारे नोकरीवर रुजु होऊन शासकिय नियमाचे उल्लंघन करत पदोन्नती मिळवून शहर अभियंता पर्यंत पदोन्नती मिळविणे, पदवीधर अभियंत्याला डावलून स्थापत्य पदविका (Diploma) धारक असलेल्या श्री.पानझडे यांना पदोन्नती देणे, शहर अभियंता हे अधीक्षक अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांचे पद असणे, विशेषतः महानगरपालिकामध्ये सदर पद इतर विभागाकडून अधिकारी नेमणूक करुन भरती करणे अनिवार्य असणे, परंतु श्री. सखाराम धोंडीबा पानझडे यांना शहर अभियंता या पदावर संबंधितांनी नियमांचे उल्लंघन करत नेमणूक दिलेली असणे, शहर अभियंता पदावर कार्यरत असतांना चूकीचे अंदाजपत्रक तयार करणे, खोटे अंदाजपत्रक तयार करणे (faulty estimate), Improvement of various roads करतांना जाणीवपूर्वक निविदा किंमत, काम आवंटीत करतांना नियमांचे उल्लंघन करणे, मर्जीच्या ठेकेदारांना नियम डावलून काम आवंटीत करणे, अर्थात निविदा आवंटीत करण्यामध्ये भ्रष्टाचार करणे, याबाबतची चौकशी होऊन श्री. सखाराम धोंडीबा पानझडे यांच्यावर कारवाई झालेली असणे, तदनंतर शासन निर्णय क्र.आरईएम-१५०९/प्रक्र-५८/२००९/१३ दि.१४ जानेवारी, २०१० चे उल्लंघन करुन अशा आरोपसिध्द झालेल्या कर्मचाऱ्याला/ अधिकाऱ्याला पुन्हा सेवेत करारपध्दतीवर रुजु करणे, सेवानिवृत्त

अस्वीकृत प्रत

झाल्यानंतरही गैरमार्गाने करारपध्दतीवर स्वत:ची पुन्हा नेमणूक करुन घेणे, करारपध्दतीवर जी नेमणुक झाली ती शासन निर्णय क्र.CBE ८३९३ /प्रक्र ३८/९३/१३ दि.१५ फेब्रुवारी १९९५ याबाबतची अंमलबजावणी करण्याऐवजी उल्लंघन करणे, करारपध्दतीवर नेमणुक करतेवेळेस जबाबदारी (Accountability) निश्चित न करता नेमणूक करणे, अर्थात भ्रष्टाचाराला मुभा देणे, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन सदर करारपध्दतीने निवडल्या गेलेल्या अधिकारी कर्मचारी यांना तांत्रिक मान्यता व प्रशासकिय मान्यता असे महत्वाचे दस्तावेजावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार नसतांना श्री. पानझडे यांनी सर्रास स्वाक्षरी करणे, तसेच Smart City अंतर्गत कामांचे रु.३१७.२२ कोटी करीता तांत्रिक मान्यता प्रदान करणे, ज्या रस्त्याकरीता सदर तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली उदाहरण म्हणुन अनुक्रमांक ४६ वर नेहरु भवन ते औरंगपूरा रस्त्याचे अंदाजपत्रकामध्ये ज्याची किंमत २.०७ कोटी अशी असणे, त्या रस्त्याचे अंदाजपत्रक खोटे व बनावटी तयार करणे, त्याबाबतची तक्रार दि. २५/०७/२०२२ रोजी होणे, याबाबत आजतागायत चौकशी न करणे, असे असतांना वारंवार कंत्राटी पध्दतीवर श्री. सखाराम धोंडीबा पानझडे यांचीच फेरनिवड करणे व वारंवार मुदतवाढ देणे, त्यानुषंगाने शासनाची आर्थिक फसवणुक करणे, या सर्व गैरमार्गाने कमविलेल्या संपत्तीतून श्री. सखाराम धोंडीबा पानझडे यांनी झाल्टा ता. औरंगाबाद जि. औरंगाबाद येथे गट क्र. १७ फेर क्र.७६३, गट क्र.१४ फेर क्र.७६३, गट क्र.१८ मध्ये फेर क्र.८०२, गट क्र.१६ फेर क्र.७६३, गट क्र.१२ फेर क्र.२१७, गट क्र.११ फेर क्र.४००, गट क्र.९ फेर क्र.१२३५, गट क्र.२५ फेर क्र.७८६, गट क्र.१० फेर क्र.८८०, गांव लिंबे जळगांव ता. पैठण येथे गट क्र.२१ फेर क्र.३९१९, नगर भूमापन क्रमांक १२८७८ शिट क्र.८२ खरेदी सहायक दुय्यम निबंधक, औरंगाबाद ५ व खरेदी दि.१९/०६/२०१४ आणि २७/१२/२०१८ फेर क्र.१६००१ दि.३/११/२०२१ फेर क्र.१६२३८ दि. ४/१२/२०२१, वर नमूद केलेले भूखंड हे कोट्यावधी रुपयांची असणे, कमी भाव दाखवून रजिस्ट्री करणे, श्री.सखाराम धोंडीबा पानझडे यांनी सेवेत असतांना स्वतःच्या नांवाने व त्यांच्या पत्नी आणि मुलगा यांचे नांवाने मालमत्ता खरेदी करणे, परंतु काही फेरफार सेवानिवृत्त झाल्यानंतर करणे, त्यामुळे संबंधितांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी होऊन वेळेत कार्यवाही पूर्ण करणे व संबंधितांना त्वरीत कार्यमुक्त करणे, ज्यांनी शासनाचे नियमांचे व शासन निर्णयांचे उल्लंघन करुन पानझडे यांच्या कंत्राटी पद्धतीने फेरनिवड व मुदतवाढ बाबत प्रस्ताव सादर केले त्यांच्यावर देखील कार्यवाही होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.अजय चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील परळ शिवडी विभागातील प्लॉट नं.२०२ (पी.टी.) २४०, ४१६, ४१७ (पी.टी.) या भूखंडावर करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम, संबंधित विकासकाने उक्त

असुधारित प्रत

भुखंडावर भव्य सुप्रिम टॉवर आणि भव्य सुप्रिम एनएक्स अशा दोन गगनचुंबी इमारतीचे बांधकाम करणे, सदर बांधकाम करतांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने २२ मजल्याची मंजूरी दिलेली असतांनाही १४ मजल्याचे बांधकाम करणे, तद्नंतर इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरही नियमबाह्य पध्दतीने सन २०२१ मध्ये सुधारीत आराखडे एसआरएला सादर करण्यात येणे, सदर आराखडा सादर करतांना वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांनाही ते न घेणे, एका इमारतीच्या बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेला फंजीबल एफएसआय हा विकासकाने एसआरएची कोणतीही परवानगी न घेता मनमानी पध्दतीने दुसऱ्या इमारतीला वापरणे, विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर इमारतीमध्ये २५ टक्के व्हीजीटर पार्किंग राखीव ठेवणे आवश्यक असतांनाही विकासकाने पार्किंग न ठेवणे, त्याचप्रमाणे इमारतीच्या पोडीयममध्ये विकासकाने स्वतःच्या व्यावसायिक कामाकरीता अनधिकृतपणे कार्यालयाचे बांधकाम करणे, सदर प्रकल्पातील उपकरप्राप्त बांधकामासंदर्भात म्हाडा प्राधिकरणाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांनाही कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र न घेता पुनर्विकास प्रकल्प राबविणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व विकासकाला दिलेल्या सर्व परवानग्या रद्द करण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये एसआरएकडे केलेली असणे, शासनाने यासर्व प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन संबंधित विकासकावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(४) **श्री.महेश शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सन २०२१ मध्ये मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती मधील सार्वजनिक शौचालय घोटाळा प्रकरणी मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या चौकशीनुसार नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी अहवाल सादर करणे, सदरच्या चौकशी अहवालात मुख्य आरोपीना क्लिन चिट देण्यात येणे, चौकशी अहवालानुसार सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधित दोषीवर कारवाई न केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या प्रकरणाची पुनश्च: वरिष्ठ दर्जाच्या भा.पो.से. अधिका-यांकडून फेरचौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने फेरचौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.गणेश नाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबई शहराच्या निर्मितीसाठी सिडकोने नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ग्रामस्थांची १ रू. प्रति चौ.मी. या दराने हजारो एकर जमिन संपादित करणे, सदर जमिनीवर राज्य शासनाने नवी मुंबई महानगरपालिका या शहराची निर्मिती करणे, सिडकोने ग्रामस्थांना विविध नागरी व पारंपारिक सुख सुविधा पुरविण्याचे आश्वासन देणे, आजमितीस या शहराची लोकसंख्या १६ लाख असणे, शहरातील सर्व घटकांना अत्यावश्यक सामाजिक सुविधा म्हणून नोड निहाय, प्रभाग निहाय, सेक्टर निहाय, मैदाने, उद्याने, शाळा, नागरी आरोग्य केंद्र, रूग्णालय, माता-बाल रुग्णालय, महिला सक्षमीकरण केंद्र, वाचनालय, अग्निशमन केंद्र, विरंगुळा केंद्र, व्यायाम शाळा, पाण्याच्या टाक्या, जलउदंचन केंद्र, मलउदंचन केंद्र इत्यादी नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता भूखंड आरक्षित ठेवलेले असणे, तसेच सदर भूखंडामध्ये भूमिपुत्रांचे उर्वरित पुनर्वसनाकरिता भूखंड आरक्षित ठेवणे बंधनकारक असणे, मुलभूत सुखसुविधा आणि पायाभूत सुविधांचे रक्षण आणि विकास करण्याची जबाबदारी नवी मुंबई महानगरपालिकेवर सोपविण्यात आली म्हणून सदरचे भूखंड सिडकोने नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात यावेत याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने व स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी तसेच माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, महापालिकेने विकास योजना तयार करताना संभाव्य लोकसंख्येस आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधाकरिता तत्कालीन मा.सर्वसाधारण सभेने प्रारूप विकास योजना व प्रारूप विकास अहवालामध्ये नियोजनाच्यादृष्टीने आरक्षणे प्रस्तावित केलेली असणे, परंतु सिडकोने प्रारूप विकास योजनेमध्ये आरक्षित केलेले भूखंड एमआरटीपी १९६६ मधील विकास आराखडा नियमांचे उल्लंघन करून विक्रीस काढले असणे तसेच आजमितीस देखील सिडको उर्वरित भूखंड विक्रीकरिता जाहिराती काढत असणे, वर्तमान व भविष्यात मुलभूत सुविधांअभावी नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी सिडकोने विकास योजनेतील भूखंडाची विक्री रद्द करण्याची आवश्यकता, त्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री महोदयांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी दिलेली निवेदने, प्रारूप विकास आराखडा सन २०१७ पासून शहर नियोजन मानांकनानुसार निव्वळ सामाजिक विकासासाठीच शिल्लक ठेवलेल्या वास्तव जमिनी या शहरातील भूमिपुत्र आणि स्थानिक रहिवाशी यांच्यासाठीच असणे, महापालिकेने आरक्षित ठेवलेले भूखंड मोफत आणि जमीन मालकीसह कायमस्वरूपी तातडीने नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अतारांकित

**(६) सर्वश्री. धर्मरावबाबा आत्राम, नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"विजेचे दर महाराष्ट्रात जास्त असल्यामुळे महाराष्ट्रातील ३६ स्टील उद्योग बंद झाले असून १० स्टील उद्योग गुजरात, मध्यप्रदेश व छत्तीसगढ या राज्यांमध्ये स्थलांतरित झाले आहे. यामध्ये सर्वाधिक फटका विदर्भ व मराठवाडयातील उद्योगांना बसणे, त्यामुळे महाराष्ट्रात रोजगार निर्मीती कमी होवून जिल्हयात मोठया प्रमाणात रोजगाराचा प्रश्न निर्माण होणे, महाराष्ट्रातील बहुतांश स्टील उद्योग बंद झाल्यामुळे मध्यप्रदेश, छत्तीसगड, गोवा, गुजरात व ओडीसा यांनी महाराष्ट्रातील स्टील उद्योगाची बाजारपेठ काबीज केली असल्याचे निदर्शनात येणे, महाराष्ट्रात स्टील उद्योग पुर्ववत सुरु होण्याच्या दृष्टीने शासनाच्या वतीने स्टील उद्योगाकरीता विजदर कमी करण्याबाबत किंवा सबसिडी देण्याबाबत करण्यात आलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री.हसन मुश्रीफ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कर्नाटक सरकारच्या पाटबंधारे खात्याअंतर्गत "कृष्णा भाग्य जल निगम" या संस्थेने अलमट्टी धरणावर अतिरिक्त २६ दरवाजे बसवण्यासाठी निविदा प्रसिध्द केलेली असणे, अलमट्टी धरणाची सध्या ५१९ मीटर उंची असून ती वाढवून ५२४.२५६ मीटर करण्यात येणार असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सांगली,सातारा व कोल्हापूर जिल्हयांत महापूर संकट निर्माण होण्याची शक्यता असणे, त्यामुळे अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास महाराष्ट्रातून तीव्र विरोध असणे, अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याच्या विरोधात महाराष्ट्र व आंध्र प्रदेश शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, तथापि लवादाने कर्नाटक सरकारला आधी कृष्णा पाणी वाटप लवादची मंजुरी घेण्यास सांगण्यांत आलेले असणे, मात्र लवादाने या धरणाची उंची वाढविण्यास मंजुरी दिलेली नसणे, तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार अलमट्टीची उंची वाढविल्यास दोन्ही राज्यांतील पाण्याखाली जाणाऱ्या गावात जनसुनावणी घ्यावी,लोकांची मते अजमावून घेण्यात येऊन त्याबाबत न्यायालयात अहवाल सादर करावा,यासाठी दोन्ही राज्यांनी संयुक्त सर्व्हे करावा, असे आदेश दिलेले असणे, परिणामी हा सर्व्हेही झालेला नसणे, अलमट्टीची उंची वाढण्यासाठी वन व पर्यावरण विभागाची मंजुरीही लागणे आवश्यक असणे, परंतु ही मंजुरीही मिळालेली नसणे, त्यामुळे राज्य सरकारने तेथील मा.लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना व नागरिकांनी मोठे जनआंदोलन उभारण्याची गरज व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

(८) **श्री.बालाजी किणीकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अंबरनाथ (जि.ठाणे) शहराचे वाढते शहरीकरण व शहरातील वाढती लोकसंख्या यामुळे सद्य:स्थितीत पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर होत चाललेला असणे, सद्य:स्थितीत अंबरनाथ शहराला १४० एम.एल.डी. पाणी कोठा मंजूर असून त्यापैकी १२० एम.एल.डी. पाणी उल्हासनदीमधून उचलले जात असणे, उर्वरीत २० एम.एल.डी. पाणी कोट्यापैकी १० एम.एल.डी. एम.आय.डी.सी.ला परत देणे व त्या ऐवजी ६ एम.एल.डी. फॉरेस्ट नाका व ४ एम.एल.डी. पालेगाव येथे मंजूर करण्याबाबत तत्कालीन मा. पाणीपुरवठा मंत्री यांच्या दालनात झालेल्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, अंबरनाथ शहराला वाढीव पाणीपुरवठा मिळावा याकरीता अंबरनाथ विधानसभा क्षेत्राच्या लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मा. पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे वारंवार मागणी केलेली असणे, मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.पाणीपुरवठा मंत्री महोदयांनी एम.आय.डी.सी. ला वाढीव पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना केलेल्या असणे, परंतू, अंबरनाथ शहराचा विकास व शहरातील लोकसंख्या ज्याप्रमाणे दिवसेंदिवस वाढत आहे त्याप्रमाणात भविष्यातही सुरळीत पाणी पुरवठा करता यावा याकरीता सन २०४८ ची अंदाजित लोकसंख्या लक्षात घेऊन मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील महानगरपालिका व नगरपालिका यांच्याकडील उपलब्ध पाणी आरक्षण हे कमी असणे, त्यामुळे भविष्यातील पाणी टंचाई व पाण्याची मागणी याचा विचार करता पाण्याचे नवीन स्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता, अंबरनाथ शहराला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करून मिळावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरावा केलेला असणे, त्याचअनुषंगाने अंबरनाथ नगरपरिषद हद्दीमध्ये राबविण्यात येणारी पूरक पाणी पुरवठा योजना अमृत टप्पा-२ या योजनेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दि.०३ ऑक्टोबर, २०२२ रोजी तांत्रिक मंजुरी देऊन त्याच दिवशी प्रशासकीय मान्यतेकरिता नगरविकास विभागाकडे सादर केलेले असणे, परंतु, अद्याप पर्यंत सदर योजनेस प्रशासकीय मान्यता मिळालेली नसणे, त्यामुळे सदर योजनेस तातडीने प्रशासकीय मान्यता देण्याची आवश्यकता, तसेच मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामधील शहराचे वाढते शहरीकरण व वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पाण्याचे नवीन स्त्रोत निमार्ण करुन पाणी साठा क्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.''

(९) **श्री.दिलीप लांडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरासह संपूर्ण उपनगरामध्ये मोठया प्रमाणात ऑनलाईन लॉटरी सुरू असणे, अनधिकृत ऑनलाईन लॉटरीचा मोठया प्रमाणावर सुळसुळाट होत असल्याने शासनाच्या

महसुलात होत असलेली घट, तसेच मुंबईतील तरूण वर्ग हा मटका व जुगार व्यसनांना बळी पडत असून ऑनलाईन लॉटरी ही स्टील, अॅपेक्स, प्लॅटिनम या कंपन्यांनी मुंबईसह संपूर्ण राज्यभर जाळे विणण्याचे काम सुरु केले असून महाराष्ट्रातील तरुण, बेरोजगार हा मटका, जुगारासारख्या ऑनलाईन लॉटरीच्या विळख्यात सापडलेला असणे, राज्यात पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण व आरोग्य सुधारणा, महिला व बाल विकासाचे मजबुतीकरण तसेच कृषी क्षेत्र आदीसाठी होतो त्याच धर्तीवर लॉटरीची विक्री करणे हा अनेक बेरोजगार तरुणांसाठी पूर्णवेळ किंवा अर्धवेळ व्यवसाय झाला असणे, याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालणे गरजेचे असणे, चांदिवली, साकीनाका, पवई आदि विभागातील अनधिकृत ऑनलॉईन लॉटरीवर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(१०) **श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई पश्चिम उपनगरातील मालाड पूर्व कुरार व दिंडोशी पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या कुरार गांव, आप्पा पाडा, पिंपरीपाडा, संतोष नगर , शिवशाही नगर, पठाणवाडी आणि क्रांती नगर आदि ठिकाणी गेली वर्षभरापासून एमडी, ई-सिगारेट, चरस-गांजा आदि अमलीपदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री होऊन त्यामध्ये तरुण पिढी व्यसनाच्या आधीन जाऊन सेवन करीत असल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच दि.१०.१२.२०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणी ड्रग्स पेडलर अमली पदार्थांची तस्करी करुन विक्री करीत असणे, सदर अमली पदार्थ या भागातील तरुण युवक, युवती, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि व्यसनाधीन नागरीक मोठ्या प्रमाणात सेवन करीत असल्याचे आढळून येणे, या संदर्भात या भागातील स्थानिक नागरीकांनी दिंडोशी व कुरार पोलीस ठाण्यात अनेक वेळा तक्रार दाखल केली असता यावर पोलीसांकडून तात्पुरती जुजबी स्वरुपात कारवाई करण्यात येणे, त्यानंतर पुन्हा अमली पदार्थ विक्री करणे व सेवन करण्याचे प्रकार पूर्ववत सुर असणे, सदर प्रकरणात स्थानिक पोलीसांचाही समावेश असल्यामुळेच अद्यापपर्यंत या भागातील अमली पदार्थांची तस्करी-विक्रीवर कायमस्वरुपी रोखण्यास शासन तथा पोलीसांना अपयश येणे, यामुळे भारताचे भावी नागरीक असलेली तरुण पिढी व्यसनाधीन होऊन वाम मार्गाला जाण्याचा निर्माण झालेला धोका, सदरहू भागात अमली पदार्थांच्या अवैध विक्रीमुळे तरुण पिढी वाया जात असल्याबाबत येथील पालकांमध्ये तीव्र चिंतेचे वातावरण असणे, सदरहू भागातील अवैधरित्या अमली पदार्थांची विक्री करणारी टोळी मुख्य सुत्रधारासह उध्वस्त करुन कारवाई करण्यासाठी आणि तरुण पिढीला व्यसनापासून वाचविण्यासाठी शासनाने विशेष मोहिम राबवून तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत

अग्रिम प्रत

निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.’’

(११) **श्री.नितेश राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सन २०२१ ते २०२२ या कार्यकाळात अंबड पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात खून झाले असणे, तसेच पीआय भगीरथ देशमुख यांचा मनमानी कार्यभार चालू असणे, एका वर्षात दहा खून झाले असून अशा गंभीर प्रकरणात आर्थिक देवाण-घेवाण झाल्याचे स्पष्ट झाले असणे, त्यामुळे एका वर्षात एवढे खून होणे, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड घबराट निर्माण झाली असणे, तसेच काही खून हे आकस्मित मृत्यू दाखवून जेव्हा न्यायालयाने फटकारले यानंतर खूनाचा म्हणून गुन्हा दाखल करून घेणे, अंबड पोलिस स्टेशनचा हद्दीमध्ये अंबड लिंक रोड या भागात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे चालू असणे, एक अवैध व्यवसाय दत्त चौक येथील शाळेच्या बाजूलाच चालू असणे, सदर अवैध व्यवसायांमध्ये पोलीस नाईक प्रशांत नागरे  हे पार्टनर असणे, भगीरथ देशमुख यांचे सर्व आर्थिक व्यवहार प्रशांत नागरे बघत असणे, पीआय भगीरथ देशमुख आणि प्रशांत नागरे यांची सीआयडी मार्फत चौकशी करणे तसेच त्यांच्या प्रॉपर्टी ची पूर्ण चौकशी करण्यात येणे, त्यांनी मोठ्या प्रमाणात अवैधरित्या प्रॉपर्टी त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने घेतली असणे, मोठ्या पॉलिटिकल माणसाचा आमच्या डोक्यावर हात आहे असे ते स्थानिक नागरिकांना सांगत असणे, तसेच भगीरथ देशमुख यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात खून झाले असताना देखील त्यांना त्यांच्यावर कुठलीही कारवाई न होणे, गेल्या दहा वर्षापासून प्रशांत नागरे हे देखील त्याच पोलीस स्टेशनला असणे, त्यांना सदर पोलिस स्टेशन मध्ये दहा वर्षे ठेवण्यामागचे कारण काय असणे, प्रशांत नागरे यांना अद्याप एकही रिवार्ड नसताना त्यांना प्रत्येक पोस्टिंग मध्ये एक्सटेंशन मिळत असणे, भगीरथ देशमुख आणि प्रशांत नागरे यांच्यावर बडतर्फीची कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे व पिंपरी चिंचवड शहरात २००५ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एस.आर.ए)  प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणे,  पुणे व पिंपरी चिंचवड शहरात ५८६ झोपडपट्ट्या असणे गेल्या १७ वर्षात केवळ ८१ झोपडपट्ट्याचे पुनर्वसन करण्यात येणे, पुणे आणि नागपूर साठी प्राधिकरण स्थापन करण्यात येणे, या प्राधिकरणाच्या नियमावलीत राज्य सरकारने वेळोवेळी बदल करण्यात येणे त्यामुळे एस आर ए ची

अप्रकाशित

नव्याने सुधारित नियमावली गेल्या १ वर्ष पासून राज्य शासनाकडे प्रलंबित असणे नियमावली न झाल्याने झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर न होणे, झोपडपट्टी धारकांना किती चौरस  फूट घर द्यावे विकासकांना टी डी आर किती द्यावा इमारतीची उंची झोपडपट्टीतील छोटे व्यवसाय उदोग यांना जागा देण्याबाबत  मोठ्या प्रमाणावर गोंधळाची स्थिती असणे, नागरिकांकडून बळजबरीणे संमती पत्रावर सह्या गोळा करून प्रकल्प मान्यतेसाठी विकासकाकडून सादर करण्यात येणे, झोपडपट्टी धारकांना न्याय न मिळणे, शहरातील गुलटेकडी, इंदिरानगर, औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, भवानी पेठ व डायस प्लॉट येथील पात्र लोकांवरील होणाऱ्या अन्यायाविरोधात सहकारी गृहरचना संस्था कडून इमारत उभारण्याच्या प्रस्तावास एस आर ए ची मान्यता मिळणे, सध्या सुरु असलेल्या व काही प्रमाणात एस आर ए योजनेतील बांधून झालेल्या इमारतीमध्ये बंद अवस्थेतील लिफ्ट, अस्वच्छता, अरुंद जिने, कमी जागा, अपुरा पाणीपुरवठा, या सारखे असंख्य प्रश्न निर्माण होणे, ज्यादा अपात्र झोपडपट्टी धारक ठरविण्याची पद्धत पारदर्शक पणे राबविण्याची आवश्यकता महापालिका व एस आर ए च्या प्रकल्पाची संयुक्त उभारणी करण्याची आवश्यकता यामुळे पंतप्रधान आवास योजनेचे उद्धिष्ट पूर्ण होण्यास मदत होणे, सातत्याने बदलत असलेल्या धोरणामुळे  विकासक काम करण्यास पुढे न येणे, एस आर ए च्या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, झोपडपट्टी धारकाचे प्रबोधन करून पुनर्वसनाला चालना देण्याची आवश्यकता, मुंबईच्या धरतीवर विकासकांना टी डी आर वापराचे बंधन शिथिल करण्याची आवश्कता, एस.आर.ए. कडून नव्याने सुधारित नियमावली तयार करण्यात येणे. परंतु  गेल्या वर्ष भरापासून ती राज्य सरकारकडे मान्यते करिता पडून असणे स्मार्ट सिटी, अर्बन सिटी, मेट्रो सिटीकडे, शहर वाटचाल करत असताना झोपडपट्ट्याचे पुनर्वसन करणे गरजेचे असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१३) **ॲड. राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात शेतकऱ्यांकडून होत असलेल्या सततच्या जलसिंचनामुळे चिबड, पाणथळ व क्षारयुक्त जमिनींचे प्रमाण वाढले असून, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय (IRD) च्या माध्यमातून यापूर्वी चिबड, खारवट व पाणथळ जमिनी निर्मुलन कार्यक्रम आखण्यात आला असणे, यासाठी दि. २१/०७/२०२० रोजीच्या जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयानुसार ८० टक्के शासन निधी, १० टक्के संबंधित जमीन मालक व १० टक्के CSR असे धोरण ठरविण्यात आले व तदनंतर ९० टक्के शासन निधी, १० टक्के संबंधित जमीन मालक असे धोरण ठरविण्याचे शासनाच्या विचाराधीन असणे या धोरणामुळे कालवा लाभक्षेत्राबाहेरील दुजाभाव केला जात असल्याने नाराजीची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली असणे, कालवा

असुधारित प्रत

लाभक्षेत्रातील पाझरचर योजनांचे धोरणच कालवा लाभक्षेत्राबाहेरील शेतकरी यांच्यासाठी निश्चित करावे व १० टक्के लोकवर्गणीची अट रद्द करावी अशी मागणी शेतकरी करीत असून, याबाबतची अट रद्द करावी अशी मागणी मा. लोकप्रतिनिधी यांनी देखील मा. मंत्री यांचेकडे केली असणे, त्याच बरोबर दौंड (जि. पुणे) तालुक्यातील चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनीने सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करण्याची देखील मागणी माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ मध्ये केली असणे, १० टक्के लोकवर्गणीची अट रद्द करून, सुधारित धोरण तयार करण्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसणे तसेच सर्वेक्षण करून प्रस्ताव सादर करण्याबाबत देखील कोणतीही कार्यवाही झाली नसणे, तसेच पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्प ते लोणी काळभोर पर्यंत बंद नळी कालव्याचा प्रस्ताव देखील मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने कालव्याच्या पाण्याची नासाडी होत असणे, खडकवासला कालवा, चाऱ्या, पोटचाऱ्या यांची झालेली दुरवस्था, तसेच जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याने परिसरातील गावांना दुष्काळाचा सामना करावा लागत असणे, एकीकडे पाण्याचा निचरा न झाल्याने तर दुसऱ्या भागात पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्याचे शेतीचे कमी झालेले उत्पन्न त्यामुळे होत असलेले आर्थिक नुकसान यामुळे पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१४) **सर्वश्री.महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"नवी मुंबई सिडको प्रशासनामार्फत प्रकल्पग्रस्त शेतक-याला मिळालेल्या वाढीव नुकसान भरपाई रक्कमेच्या काही प्रमाणात रक्कम मावेजा रक्कम म्हणून आकारत असून सदर रक्कम सिडकोला भरण्याबाबत वाद असल्यामुळे शेतकऱ्यांना व सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड त्रास होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ रोजी उघडकीस येणे, त्रिपक्षीय करारानुसार विकासक जमिनीचे मालक असून मुळ जमिन मालक सदर रक्कम सिडकोला देण्यासाठी तयार नसणे, वाढीव नुकसान भरपाईचा मावेजा हा मुळ शेतक-याला मिळत असल्याने सिडको द्यावयाची मावेजा रक्कम मुळ शेतक-याने भरावी अशी विकासकाची भूमिका असणे, शेतकरी आणि विकासक यांच्या वादात सिडकोकडे मावेजा रक्कम कुणीच भरत नसल्यामुळे जमिनीवरील विकासकाने उभारलेल्या इमारतींना Lease deed व Conveyance deed व सदनिका हस्तांतरण सिडको प्रशासन करत नसणे, सदर जागेतील इमारतीमध्ये राहणा-या सर्वसामान्य नागरिकांना सदनिका घेताना व सदनिका विकताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे शेतकरी, विकासक व सिडको यांच्या वादात सर्वसामान्य नागरिक भरडला जात असून त्यांना न्याय मिळण्याबाबत शासनाने सदर रक्कम वसूल करण्यासाठी करावयाची आवश्यक कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची प्रतिक्रिया.”

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई विधेयक, २०२२.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अजित पवार व पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई विधेयक, २०२२.**

---

**(मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

सात : **सर्वश्री अजित पवार, अजय चौधरी, अनिल पाटील, अमित देशमुख, अमित झनक, अशोकराव चव्हाण, आदित्य ठाकरे, इंद्रनिल नाईक, कैलास गोरंट्याल, चंद्रकांत नवघरे, छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, दिलीप वळसे-पाटील, देवेंद्र भुयार, धर्मरावबाबा आत्राम, धिरज देशमुख, नानाभाऊ पटोले, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री नितीनकुमार देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री बळवंत वानखडे, बाबासाहेब पाटील, बाळासाहेब आजबे, भास्कर जाधव, मनोहर चंद्रिकापूरे, मोहनराव हंबर्डे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री रणजीत कांबळे, रविंद्र वायकर, राजु पारवे, राजू कारेमोरे, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री राजेश टोपे, राजेश एकडे, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री विकास ठाकरे, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, विनोद निकोले, संजय बनसोडे, संदिप क्षिरसागर, सहसराम कोरोटे, सुनिल केदार, सुनिल प्रभू, सुभाष धोटे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अबू आजमी, रईस शेख, धनंजय मुंडे, माधवराव पाटील-जवळगावकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती

अप्रकाशित प्रत

जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता "सायट्रस इस्टेट" स्थापन करण्याच्या निर्णयाची आवश्यकता, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, तसेच, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील पिकांचे, विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहीर करुन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारले असणे, विदर्भात कापसावर लाल्या रोगाचा व संत्र्यांवर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली असणे, विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात सहा दिवसांत सात युवा शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असणे, “शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करु” ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, सन २०१५ ला २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व २०२१ ला निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे, बांगलादेश सरकारने आयात शुल्कात वाढ केल्याने, मागणी करुनही केंद्र सरकारने हस्तक्षेप न केल्याने व राज्यसरकारनेही केंद्रसरकारकडे पाठपुरावा न केल्याने विदर्भातील संत्र्याच्या निर्यातीत ८० ते ९० टक्के घट येऊन शेतकरी अडचणीत आला असणे, नैसर्गिक आपत्ती व अन्य कारणांमुळे विदर्भातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आला असताना सोयापेंड व कापूस आयात शुल्काबाबत निर्णय न घेतला जाणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचे धान विक्रीअभावी पडून असणे, विदर्भात अधिवेशन सुरु असताना माओवाद्यांनी स्थानिक आमदार आणि प्रशासनाला परिणाम भोगण्याची धमकी दिलेली असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील प्रकल्प खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, भिलाईप्रमाणे मोठ्या प्रकल्पाची संधी महाराष्ट्राने गमावली असणे, यावर फेरविचार होण्याची आवश्यकता असणे, विदर्भात खनिज उत्खननानंतर त्यावर आधारित उद्योगांची उभारणी विदर्भातच व्हावी, अशी

विदर्भवासियांची मागणी असणे, नांदेड ते जालना या द्रुतगती जोडमहामार्गाचे काम तसेच समृध्दी महामार्गाचे विस्तारीकरण नागपूर ते भंडारा-गोंदिया आणि नागपूर ते गडचिरोली करण्याची आवश्यकता, समृध्दी महामार्गाच्या नियोजित आराखड्यातील कृषी क्लस्टरांचे काम प्राधान्याने हाती घेण्याची आवश्यकता, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे, मुक्तीसंग्राम दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणत्याही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे प्रलंबित प्रश्न, तसेच, विदर्भातील सॅफ्रन प्रकल्प, राष्ट्रीय खनिकर्म आरोग्य संस्थान (एनआयएमएच), केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ (श्रमिक शिक्षा बोर्ड) या संस्था विदर्भातून इतर राज्यात स्थलांतरित करण्यात आल्याने विदर्भवासीयांमध्ये अन्यायाची भावना निर्माण झालेली असणे, मागील सरकारने २९ जून, २०२२ रोजी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला असला तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नसणे, एमएसएमई गुंतवणुकीत विदर्भ व मराठवाडा हे दोन विभाग मागे पडले असताना या मागास आणि राज्याच्या इतर भागात होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे विदर्भ, मराठवाडा व राज्याच्या इतर भागात येणारे प्रकल्प रखडलेले असणे, मिहान प्रकल्पात गुंतवणूक करार झाले असताना कंपन्यांचा फारसा प्रतिसाद न मिळणे, रोजगार निर्मितीवर त्याचा परिणाम झाला असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असणे, तसेच, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्रातील आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषत: विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भाच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : सर्वश्री रणधीर सावरकर, समीर कुणावार, प्रशांत बंब, अभिमन्यू पवार, भरतशेट गोगावले, राम सातपुते, ज्ञानराज चौगुले, राजेश पवार, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री संजय शिरसाट, नारायण कुचे, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, रमेश बोरनारे, प्रदिप जैस्वाल, ॲड आकाश फुंडकर, ॲड आशिष जैस्वाल, सर्वश्री दादाराव केचे, बालाजी कल्याणकर, संभाजी पाटील-निलंगेकर, मोहन मते, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री किशोर जोरगेवार, जयकुमार रावल, नरेंद्र भोंडेकर, संजय सावकारे, बच्चू कडू, मंगेश चव्हाण, भिमराव तापकीर, सुरेश भोळे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रशांत ठाकूर, नितेश राणे, बबनराव लोणीकर, संतोष दानवे, तानाजी मुटकुळे, हरिभाऊ बागडे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री. राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, सुनिल कांबळे, ॲड राहुल कुल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री राम कदम, किसन कथोरे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, टेकचंद सावरकर, संजिवरेड्डी बोदकुरवार, मदन येरावार, डॉ. तुषार राठोड, प्रा.डॉ. अशोक उईके, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, प्रकाश भारसाखळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

मागील सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारा वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प असेल, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळवून हा प्रदेश सुजलाम् सुफलाम् करणारा प्रकल्प असेल अथवा विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी युती सरकारच्या काळात सन २०१७-१८ च्या दरम्यान मंजूर करण्यात आलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादींचे काम थंड बस्त्यात टाकण्यात येणे, विदर्भ-मराठवाड्यासह उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी व नागरिकांसाठी वरदान ठरणारा समृद्धी महामार्ग डिसेंबर २०२१ मध्ये सुरू होणे अपेक्षित असताना मागील सरकारच्या संथ कारभारामुळे प्रकल्पाचे काम रखडणे, परंतु नव्या सरकारने जनभावना लक्षात घेऊन नुकतेच समृद्धी महामार्गाचे पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करणे, त्याच वेळेस समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचेही काम तात्काळ पूर्ण होऊन त्याचेही लोकार्पण होण्याची जनतेची वाढती मागणी, एडीबीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्हे निवडताना विदर्भातील जिल्ह्यांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास

अग्रिम प्रत

येणे, गत २ वर्षांत विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अतिवृष्टी होऊनही पुरेशी मदत शेतकरी बांधवांना न मिळणे, शेतकऱ्यांची दिवसा वीज मिळण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, मागील सरकारच्या कार्यकाळातील अक्षम्य दुर्लक्षामुळे विदर्भ व मराठवाड्याच्या अनुशेषात वाढ होणे, जुलै २०२२ मध्ये राज्यात सत्तांतर झाल्यानंतर विदर्भ-मराठवाड्याशी संबंधीत वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशाकडे वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेला चालना मिळणे, रस्त्यांचे जाळे विकसित करण्यासाठी विदर्भ-मराठवाड्यातील जिल्ह्यांना पुरेसा निधी प्राप्त होणे, विदर्भ, मराठवाडा व कोकणातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी नवीन सरकारने विशेष तरतूद करण्याची गरज, तसेच धान, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा याकरीता धान, सोयाबीन व संत्रा इत्यादी आधारीत प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याची तसेच, कापसावर प्रक्रिया उद्योगाला गती देण्यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरण आणण्याची ज्यामध्ये पारदर्शकता येऊन खऱ्या अर्थाने कापूस प्रक्रिया उद्योगाला चालना मिळेल अशा तरतूदी असण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात आरोग्य सुविधांना बळकटी मिळण्यासाठी या भागातील प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची नवीन शासनाने केलेली घोषणा व या घोषणेची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात जास्तीत जास्त रोजगार निर्मिती व्हावी याकरीता मागील सरकारने कोणतेही विशेष प्रयत्न न करणे, विशेषत: १८ महिन्यांमध्ये कॅबिनेट कमिटी ऑन इंडस्ट्रीजची एकही बैठक न घेणे, परंतु नवीन शासनाने नुकतीच ७०००० कोटींच्या प्रकल्पांना मान्यता देऊन विदर्भ-मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करणे, मागील ५ महिन्यांत या सरकारने विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनेक प्रकल्पांना चालना मिळालेली असताना पुढील काळात वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणा-या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना तसेच एडीबी व एचएएम योजनेतंर्गत रस्त्यांचे जाळे विकसित करण्याची व संत्रा, धान, सोयाबीन व कापूस इत्यादी पिकांवर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी नव्याने धोरण आखण्याची आवश्यकता, विशेषत: SMART, MAGNET योजनेतंर्गत प्रकल्प मंजूर करताना विदर्भ, मराठवाडा या मागास भागाला प्राधान्य देण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ व जलयुक्त शिवार टप्पा-२ ची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्याची गरज, शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी याकरीता प्रत्येक सबस्टेशनला मुख्यमंत्री कृषी सौरवाहिनीला जोडण्याची आवश्यकता, तसेच नव्याने उद्योग विदर्भ-मराठवाड्यात यावेत याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही."

अप्रकाशित प्रत

**(मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

नऊ : **सर्वश्री समीर कुणावार, मंगेश कुडाळकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री संजय गायकवाड, रणधीर सावरकर, सदा सरवणकर, ॲड. आशिष शेलार, श्री.दिलीप लांडे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रकाश आबिटकर, राजेंद्र पाटणी, ज्ञानराज चौगुले, अतुल भातखळकर, संतोष बांगर, डॉ. देवराव होळी, डॉ. बालाजी किणीकर, ॲड. आकाश फुंडकर, श्री. अनिल बाबर, प्रा.डॉ. अशोक उईके, सर्वश्री सुहास कांदे, चंद्रकांत निंबा पाटील, सौ. मंजुळा गावित, सर्वश्री संतोष दानवे, राम कदम, सर्वश्रीमती माधुरी मिसाळ, मनिषा चौधरी, सर्वश्री राजेश पवार, सचिन कल्याण-शेट्टी, अभिमन्यू पवार, डॉ. राहुल आहेर, श्री. राम सातपुते, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री कृष्णा खोपडे, नितेश राणे, विनोद अग्रवाल, संभाजी पाटील-निलंगेकर, सुनिल कांबळे, समाधान आवताडे, हरिष पिंपळे, प्रकाश आवाडे, नामदेव ससाणे, किसन कथोरे, प्रताप अडसड, मदन येरावार, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री प्रशांत बंब, योगेश सागर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, मोहन मते, गणपत गायकवाड, सुनिल राणे, सुरेश भोळे, प्रकाश भारसाखळे, जयकुमार रावल, मिहिर कोटेचा, ॲड. राहुल कुल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री सुभाष देशमुख, अमित साटम, ॲड. पराग अळवणी, श्री. पराग शाह, श्रीमती विद्या ठाकूर, डॉ. भारती लव्हेकर, कॅ.आर.तमिल सेल्वन, श्री.गणेश नाईक, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संजय केळकर, टेकचंद सावरकर, कृष्णा गजबे, किर्तीकुमार भांगडीया, तानाजी मुटकुळे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, प्रशांत ठाकूर, राणाजगजितसिंह पाटील, काशिराम पावरा, संजय सावकारे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, संजिवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेलच्या विक्रीकरात कपात केल्यानंतरही मागील सरकारच्या कार्यकाळात राज्य शासनाने अन्य राज्यांप्रमाणे पेट्रोल व डिझेलच्या दरात कपात करण्यात आडमुठे धोरण अवलंबणे, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेला महागाईचे चटके सहन करावे लागणे, विद्यमान शासन सत्तेवर येताच पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकरात कपात करण्यात येणे, मागील सरकारने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार देण्याची घोषणा सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात व सन २०२१ मध्ये करूनही या घोषणेची अंमलबजावणी न होणे, मात्र विद्यमान शासनाच्या कार्यकाळात शेतकरी हित लक्षात घेऊन रु.५० हजाराचा निधी

अप्रकाशित

तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिलेला असणे, मागील शासनाच्या काळात सरसकट शेतकऱ्यांची वीज कापण्याची मोहीम राबविण्यात आली असताना विद्यमान शासनाच्या काळात उपमुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज कापू नये असे आदेश निर्गमित करून शेतकऱ्यांचा प्राधान्याने विचार केला असणे, मागील सरकारच्या काळात काही विशिष्ट मतदार संघात निधीचे असमान वाटप करण्यात आले असताना विद्यमान शासनाच्या काळात सर्वांना समान निधी वितरित करण्याचे धोरण आखण्यात येणे, शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाचे प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या वेतनवाढीचा विचार होण्याची आवश्यकता, सन २००१ च्या पूर्वीची बीपीएड आणि कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत विचार होण्याची आवश्यकता, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच झोपडीधारकांना विकासकाविरुध्द महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरुंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतीचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरूनगर व टिळक नगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्षे उलटूनही अद्याप भोगवाटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरीता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पीडब्ल्यूआर-२०१९ योजनेतंर्गत एससी, एसटी, एनटी समाजाला दिलेल्या जमिनी फ्रीहोल्ड करण्याकरीता संबंधीत समितीचे गठन तात्काळ होण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे हद्दीतील अनेक वर्षे जुन्या झोपडीधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेत काही पदांवर अधिकारी त्याच-त्याच ठिकाणी दिर्घकाळ कार्यरत असल्याची बाब निदर्शनास येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची आवश्यकता, मुंबईचा रखडलेला विकास करण्याकरीता नियोजन आराखड्याची वेगाने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २७ डिसेंबर, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

अप्रकाशित प्रत